# नियमित दिवाणी दावा क्र.५४/२०२४ मधील

**CNR No. MHRT050003662024**

## निशाणी क्र.२३ वरील आदेश

**०१.** सदरचा अर्ज हा वादीने मयत प्रतिवादी क्र.४ गीता दुर्गाराम कदम यांचेविरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

**०२.** वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.४ गीता दुर्गाराम कदम ह्या दि.२६.११.२०२४ रोजी मयत झाल्यासंबंधी त्यांना कोणतीही माहिती मिळालेली नव्हती. प्रतिवादी क्र.४ मयत झाल्याची बाब वादी यांना समजल्यानंतर त्यांनी मयत प्रतिवादी क्र.४ यांचा मृत्यूदाखला, त्यांच्या वारसांची नावे, वय व पत्ते मिळणेकरीता प्रयत्न सुरु केले. मयत प्रतिवादी क्र.४ यांचे वारसांना रेकॉर्डवर आणण्यासाठी वादी यांना २९१ दिवसांचा विलंब झाला आहे. सदरचा विलंब वादी यांनी मुद्दामहून केलेला नाही. मयत प्रतिवादी क्र.४ यांचे वारसांना मुदतीत रेकॉर्डवर आणणे आवश्यक होते, परंतु वर नमुद कारणास्तव मयतांचे वारसांना मुदतीत रेकॉर्डवर आणता आले नाही. सबब, मयत प्रतिवादी क्र.४ यांच्याविरुद्ध झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होवून मिळण्याकरीता वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज केला आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी असे म्हणणे दिले की, सदरचे प्रकरण हे सन २०२४ ला दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.४ मयत असल्याची बाब वादी यांना माहित असून देखील प्रकरणाला विलंब व्हावा या उद्देशाने सदर मयत व्यक्तीचे वारसांना रेकॉर्डवर घेणेस २९१ दिवसांचा विलंब करुन वादी यांनी सदर अर्ज दाखल केला आहे, त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करण्याची विनंती केली.

**०४.** प्रस्तुत विचाराधीन अर्जातील कथनांचे अवलोकन केले. तसेच दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. वादपत्र (नि.०१)चे अवलोकन केले असता अबेटमेंटचा कोणताही आदेश करण्यात आलेला नाही असे दिसून येते. प्रस्तुतचा दावा हा सरस, निरस, तुटक, वाटप होऊन मिळणेकरिता दाखल केला आहे. मयत प्रतिवादी क्र.४ यांच्याविरुध्द

अबेटमेंटचा आदेश जरी झाला नसला तरीही कायद्यानुसार मुदतीत त्यांचे वारसांना दाव्यात समाविष्ट न केल्यामुळे आपसुकच प्रतिवादी क्र.४ विरुध्द सदरचा दावा अबेट झाला असा निष्कर्ष निघतो. वादीतर्फे वकीलांनी दस्तयादी नि.२२ सोबत मयत प्रतिवादी क्र.४ यांचा मृत्यू दाखला हजर केला आहे. सदरचा दावा हा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता मयत प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. एकंदरीत, दाव्याचे स्वरुप तसेच अर्जातील कथन विचारात घेता सदर अर्ज हा मंजूर करण्यालायक आहे. करिता, खालील आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज (नि.२३) मंजूर करण्यात येतो.

MHASKE DADA GOPINATH

Digitally signed by MHASKE DADA GOPINATH
Date: 2026.08.07 17:28:25 +0530

**(डी. जी. म्हस्के)**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, खेड

**दिनांक – ०७.०८.२०२६** ता. खेड, जि. रत्नागिरी.

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | RCS No.54/2024 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. CJJD & JMFC Court, Khed. |
| Date of Decision | : | 07.08.2026 |
| Order signed by Presiding Officer on | : | 07.08.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 07.08.2026 |